ISSN No-2031-5063 Vol.1,Issue.VII/Jan 2012pp.1-4

Research Paper

# मोटार वाहनांची वाढती संख्या आणि समस्या

डॉ. डी. टी पवार
बी.एस्सी. एल. एल एम. पी एच डी
प्रादेशिक परिवहन अधिकारी
कोल्हापूर विभाग

### प्रस्तावना :–

आपणास माहितच असेल की आपल्या देशामध्य प्रत्येक वर्षी जवळपास एक लाख व्यक्ती रस्त्यावरील अपघातामध्ये मृत्युमूखी पडत आहेत. त्याचप्रमाणे ४.५0 लाखापेक्षा जास्त व्यक्ती गंभीररित्या जखमी होत आहेत. त्याचप्रमाणे अशा अपघातामुळे मनुष्यहानी बरोबर मालमत्तेचे मोठया प्रमाणात नुकसान होत आहे. या सर्वाचा परिणाम म्हणून नुकसान भरपाई देणेसाठी म्हणून शासनास मोठया प्रमणात निधी उपलब्ध करावा लागत आहे. रस्यावरील वाढलेले अपघात व यामुळे होणारी मनुष्यहानी व मालमत्ताहानी यामुळे होणारे राष्ट्रीय नुकसान कमी करणेसाठी रस्त्यावरील वाहतूकीचे नियमा संदर्भात जनतेमध्ये जागृती करणे हाच एकमेव पर्याय आहे. याअंतर्गत रहदारीच्या नियमांची जनतेमध्ये जागृती निर्माण करण्याचे काम मोटार वाहन विभागा मार्फत सुरू आहे.

## १ मोटार वाहनांची वाढती संख्या :-

### भारत :-

मोटार वाहनांचा जर विचार केला तर आपणास माहितच असेल की कार्ल बेंझ सन १८८५ मध्ये द्रव पदार्थावर चालणारे पहिले मोटार वाहन रस्त्यावर आणले . याबरोबरच खर्या अर्थाने मोटार युगास सुरवात झाली . आपल्या देशामध्ये सन १८९८ मध्ये पहिली मोटार गाडी आयात करण्यात आली साधारणपणे सन १९१३ ते १९१४ मध्ये आपल्या देशात ४४१९ इतकी वाहने होती . पहिल्या महायुध्दानंतर वाहन संख्येत बरीच वाठ होऊन ती १९२७ ते १९२८ मध्ये २४९२0 १९४0 मध्ये मोटार वाहन विभागची स्थापना झाली त्यावेळी आपल्या देशात साधारणतः २ लाख इतकी वाहने होती . सन १९५१ मध्ये ३लाख ६ हजार इतकी वाहने होती. तद्नंतर १0 वर्षानें ही संख्या ६ लाख ६५ हजारावर गेली . पुढील १0 वर्षात म्हणजेच १९७१ मध्ये १८ लाख ६५ हजारावर गेली. सन १९८१ मध्ये ५३ लाख ९१ हजार इतकी वाहने तद्नंतर औधोगिक उदातिकरणाच्या धोरणामुळे वाहनाचे संख्य्ेत मोठया प्रमाणात वाढ होऊन सन १९९१ मध्ये ४ पटीने वाढ होऊन वाहन संख्या २१३७४000 वर गेली त्यानंतर १0 वर्षानी सन २00१ मध्ये जवळपास अडीच पट म्हणजेच ५४९९१000 इतकी वाहन संख्या झाली . सन २00६ मध्ये ८९६१८000 इतकी वाहन संख्या होती. तदनंतर सन २0१0 पर्यत साधारणतः प्रती वर्षी ८0 लाख अशी वाढ झाल्याचे दिसून येते . त्याच्या अनुषंगाने सन २0१0 मध्ये १२ कोटीपेक्षा जास्त वाहने आपल्या देशात आहेत . ज्यामध्ये ८९ट परिवहनेतर वाहने असून त्यामध्ये ७१ट ही दुचाकी वाहने आहेत . त्याचप्रमाणे ११ट परिवहन वाहने आहेत.

### महाराष्ट्र :-

महाराष्ट्र राज्यातील संख्येचा विचार केला तर १ मे १९६0 रोजी जेमतेम १ लाख वाहने महाराष्ट्र राज्यात होती . तद्नंतर १९७१ मध्ये ३0७३0 इतकी वाहने होती ट ासन १९९१ मध्ये २७0३३५५ इतकी वाहने होती. सन २00१ मध्ये ६७५९४७४ इतकी वाहने सन २0१0 वर्षात ९0 लाखापेक्षा जादा वाहनांची भर पडलेली आहे . गेल्या १0वर्षातील सरासरी वाढ १0त्या आसपास आहे .

### कोल्हापूर विभाग :-

कोल्हापूर विभागामध्ये कोल्हापूर सांगली सातारा या जिल्हयांचा समावेश असून सन १९८१ मध्ये ७४९५७ सन १९९१ मध्ये २६१८९२ इतकी वाहने आहेत . तसेच ३१ मार्च २0१0 रोजी १४५६४१0 इतकी वाहने आहेत . म्हणजे १९९0 ते २0१0 या २0 वर्षाच्या कालावधीत कोल्हापूर विभागात १२ लाखापेक्षा जास्त वाहनांची नोंदणी झालेली आहे . त्याचप्रमाणे कोल्हापूर विभागात सन २0११ पर्यत १६२९६८२ इतक्या वाहनांची नोंद झाली आहे. सदर वाहनापैकी कोल्हापूर जिल्हयामध्ये ७0८९४९ इतकी वाहने असून सांगली जिल्हा ४६0७२३ सातारा जिल्हयात ४६00१0 इतकी वाहने आहेत .

## २ मोटार वाहन अपघात :-

मोटार वाहनाच्या वाढत्या संख्येबरोबर दळणवळणाची मोठी समस्या दूर होत असताना काही नविन समस्या निर्माण होत आहेत . ज्यामध्ये वाहतूकीची कोंडी पार्कीगची जागा हवेचे प्रदुषण आवाजाचे प्रदुषण वाहनांचे अपघात यामुळे होणारे राष्ट्रीय नुकसान यांचा समावेश आहे . मोटार वाहन अपघातासंदर्भात भारत महाराष्ट्र कोल्हापूर विभागातील माहीती खालीलप्रमाणे ः

### भारत :-

### अपघात :-

आपण सन १९७0 पासून जर पहिले तर असे दिसून येते की सन १९७0 मध्ये प्रतिदिनी सरासरी ३१७ अपघात घडून आलेली आहेत . सन १९८0 मध्ये प्रतिदिनी ४२६ अपघात घडले आहेत . सन १९९0 मध्ये प्रतिदिनी ७८५ अपघात घडून आलेले. सन २000 साली प्रतिदिनी १0७२ अपघात घडून आलेले आहेत . सन २00७ साली प्रतिदिनी १३३0 अपघात घडून आले आहेत . याचा विचार करता सन १९७0 पासून अपघाताची संख्या ३ पटीने वाढलेली आहे . गेल्या १0 वर्षात प्रतिदिनी ११00 ते १३५0 इतके अपघात होत आहेत .

### मृत:

सदर अपघातामध्ये सन १९७0 मध्ये प्रतिदिनी ४0 व्यक्ती मृतुमुखी पडत होत्या . सन १९८0 मध्ये प्रतिदिनी ६८ व्यक्ती सन १९९0 मध्ये १४२ व्यक्ती २00४ मध्ये २१६ व्यक्ती सन २00७ मध्ये प्रतिदिनी ३0६ व्यक्ती मृत्युमुखी पडलेले आहेत. म्हणजेच सन २000 ते २00७ या वर्षात सरासरी २00 ते ३00 च्या दरम्यान व्यक्ती मृत्युमुखी पडलेल्या आहेत

### जखमी :

त्याचप्रमाणे जखमींचा जर विचार केला तर सन २000 मध्ये प्रतिदिनी १0९४ व्यक्ती गंभीर जखमी झालेल्या आहेत. ट ासन २00७ मध्ये प्रतिदिनी १७00 व्यक्ती गंभीर जखमी झाल्या आहेत.

### महाराष्ट्र :-

महाराष्ट्र राज्यामध्ये अपघातांच्या संख्येचा विचार केला तर सन २00८ मध्ये ७५५२७ अपघात झाले असून त्यामध्ये १२३९७ व्यक्ती मृत्युमुखी पडले ५२७८0 व्यक्ती गंभीररित्या जखमी झालेले आहेत . त्याचप्रमाणे सन १९९८ मध्ये अपघाताची संख्या ७४४२९ इतकी आहे . त्यामानाने गेल्या १0 वर्षात अपघाताची संख्या सिमीत झालेली दिसून येते . तथापी १९९८ मध्ये ९८३४ व्यक्ती मृत्युमुखी पडल्याचे दिसूते . म्हणजेच १0 वर्षात २५00 व्यक्ती मृत्युमुखी पडलेले आहेत. जखमींचा विचार केला तर सन १९९८ मध्ये ५३५४२ व सन २00८ मध्ये ५२८८0 व्यक्ती जखमी झालेल्या आहेत याचा विचार केला तर

जखमींची संख्या सिमीत आहे .

## कोल्हापूर विभाग :-

कोल्हापूर विभागामध्ये सन २००८ मध्ये ४०३३ इतके अपघात झालेले असून प्रतिदिनी सरासरी ११ अपघात झालेले आहेत . त्याचप्रमाणे १९९८ मध्ये ४२४४ इतके अपघात झाले होते . व सरासरी १२ इतकी होती . म्हणजेच १९९८ व २००८ चा विचार केला तर अपघातांची संख्या २११ ने कमी झालेली आहे .

सदर अपघातामध्ये कोल्हापूर विभागात सन २००८ मध्ये ८९४ व्यक्ती मृत्युमुखी पडल्या आहेत तसेच सन १९९८ मध्ये ९०१ व्यक्ती मृत्युमुखी पडलेल्या आहेत . म्हणजे १९९८ चे प्रमाणात सन २००८ मध्ये मृत्युचे प्रमाण ७ ने घटले आहे . कोल्हापूर विभागात गेल्या दहा वर्षात रस्ता सुरक्षा संदर्भात जे जागृतीचे काम सुरू आहे त्यामुळे अपघातांची संख्या सीमीत झालेली आहे .

कोल्हापूर विभागामध्ये सन २००८ मध्ये झालेल्या अपघातात ४६६४ व्यक्ती गंभीररित्या जखमी झाल्या आहेत . त्याचप्रमाणे १९९८ मध्ये ४८३८ व्यक्ती गंभीर जखमी झाले होते. म्हणजेच १९९८ चे तुलनेत सन २००८ मध्ये १७४ व्यक्तीचे जखमींचे प्रमाण घटले आहे.

गेल्या १० वर्षात कोल्हापूर विभागात वाहनसंख्या मोठया प्रमाणात वाढली आहे . त्यामुळे या विभागात रस्ता सुरक्षा जनजागृतीचे काम चालू आहे. त्याचा परिणाम संख्या जखमींची संख्या सीमीत झालेली आहे

कोल्हापूर विभागातील अपघाताची माहिती

| सन | कोल्हापूर | | | सांगली | | | सातारा | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अपघात संख्या | मृत संख्या | जखमी संख्या | अपघात संख्या | मृत संख्या | जखमी संख्या | अपघात संख्या | मृत संख्या | जखमी व्यक्ती |
| 1996 | 1565 | 247 | 1769 | 1120 | 219 | 1396 | 1624 | 338 | 1726 |
| 1997 | 1485 | 278 | 1585 | 1113 | 232 | 1455 | 1736 | 345 | 1777 |
| 1998 | 1529 | 295 | 1757 | 1083 | 243 | 1183 | 1632 | 363 | 1895 |
| 1999 | 1518 | 283 | 1683 | 1116 | 270 | 1325 | 1572 | 341 | 1916 |
| 2000 | 1582 | 242 | 1783 | 1169 | 249 | 1485 | 1662 | 382 | 2011 |
| 2001 | 1568 | 283 | 1741 | 1146 | 255 | 1395 | 1466 | 373 | 1849 |
| 2002 | 1489 | 292 | 1918 | 1101 | 274 | 1257 | 1481 | 372 | 2108 |
| 2003 | 1598 | 273 | 1819 | 1035 | 298 | 1184 | 1337 | 353 | 1769 |
| 2004 | 1486 | 322 | 1955 | 898 | 188 | 102 | 1332 | 312 | 1813 |
| 2005 | 1371 | 311 | 1667 | 1095 | 250 | 1231 | 1304 | 290 | 1811 |
| 2006 | 1498 | 334 | 1790 | 1024 | 288 | 1556 | 1417 | 278 | 1847 |
| 2007 | 1524 | 379 | 1690 | 1046 | 278 | 1090 | 1289 | 241 | 1665 |
| 2008 | 1985 | 319 | 1888 | 1096 | 274 | 1206 | 1289 | 301 | 1570 |
| 2009 | 2183 | 344 | 1902 | 1145 | 312 | 1315 | 1180 | 290 | 1860 |

कोल्हापूर विभागामध्ये प्रतिदिनी ११ अपघात झालेले आहेत . त्याचप्रमाणे कोल्हापूर विभागात दर २ दिवसाला ५ व्यक्ती मृत्युमुखी पडलेल्या आहेत . त्याचप्रमाणे कोल्हापूर विभागात प्रत्येक दिवशी १३ व्यक्ती रस्त्यावरील अपघातात गंभीररित्या जखमी झालेली .

## मोटार वाहन अपघातामुळे होणारे नुकसान :-

रस्त्यावरील अपघातामुळे मनुष्यहानी बरोबर मालमत्ता हानीमुळे कोटयावधी रूपयांचे नुकसान प्रत्येक वर्षी होत आहे. त्यामध्ये मोटार वाहन निर्मिती नुकसान हॉस्पीटलमधील खर्च न्यायालयाचा खर्च विमा खर्च व इतर खर्च हे राष्ट्रीय उत्पन्नाच्या प्रमाणात असून ही फारच गंभीर बाब आहे . या व्यतीरिक्त रस्त्यावरील अपघातामध्ये बहुतांशी ट्रक चालक मालांचे व्यापारी प्रवाशी व रस्त्यावरील पादचारी इतर वाहनातील व्यक्ती मृत्युमुखी पडतात . त्यामध्ये बरेचजण घरामधील कर्ती व्यक्ती असतात. त्यांच्या मृत्यूमुळे त्यांचे कुटुंब उध्वस्त होते . मुलाबाळांना फार मोठया आपत्तीस तोंड द्यावे लागते. काही कुटुंबात एकुलती एक व्यक्ती असते . त्यामुळे सर्व जिवन उध्वस्त होते. अशा विविध संकटांना सदरिल व्यक्तींच्या कुटुंबातील व्यक्तींना तोंड द्यावे लागते व त्यांचे जीवन जगणे असहय होते

## २निष्कर्ष :-

रस्त्यावरील अपघातामध्ये मृत्युमुखी पडणारी व्यक्ती चालक मालक पादचारी कोणाही असो तो कुटुंबाचा जबाबदार व्यक्ती असतो . अपघात टाळण्यासाठी रस्त्यावरील विविध सिग्नल्स वाहतूकीची चिन्हे वाहतूकीचे नियम प्रामुख्याने वेगावर नियंत्रण समोरील वाहनास ओव्हरटेक करतांत घ्यावयाची काळजी याबाबत प्रत्येकाने जागरूक असणे अत्यावश्यक आहे रस्ता सुरक्षा संदर्भात प्रत्येक नागरिकांनी प्राधान्य दिलेच पाहिजे . आपल्या घरापासूनच रस्ता सुरक्षा संदर्भात प्रबोधन कार्य करणे आवश्यक आहे. प्रत्येक पालकांनी आपल्या मुलांना रहदारी नियम पाळण्याबाबत योग्य शिक्षण दिले पाहिजे त्याचप्रमाणे सार्वजनिक रस्त्याचा वापर करताना शिस्त पाळली तर निश्चित पुढील जीवनास शिस्त निर्माण होईल याची जबाबदारी जाणीव करून देणे आवश्यक आहे. आपण संयुक्तपणे रस्ता सुरक्षा संदर्भात समाजामध्ये वाहतूकीचे नियम पालन करून अपघात रोखणे व राष्ट्रीय नुकसान कमी करणेबाबत प्रबोधन करूया .

"मनुष्य जन्म हा मृत्यु पावण्यासाठी नसून भौतीक कर्तव्य पार पाडून मुक्तीचा मार्ग मिळवण्यासाठी झालेला आहे ."आपण सर्वजण रहदारीचे नियम पाळूया आणि रस्त्यावरील अपघात कमी करूया .